महाराष्ट्र पोलीस दलामधील पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र.सीटीई-०५२२/प्र.क्र.४८/पोल-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० जून,२०२३.

**वाचा:-**

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. असंक-१००१/प्र.क्र.२१/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१०/०९/२००१.
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/विसु-१, दि. ११/०२/२०१६.
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आपुकक्ष, दि. २५/०५/२०१७.
४. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि. ०९/०६/२०१७.
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि. २९/०६/२०१७.
६. गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ ब, दि. २५/०२/२०२२.
७. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आपुक, दि.२७/०४/२०२२.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/४४/मनुष्यबळ-आकृतीबंध /२६-ब/१२-अ/२०१४/१५३, दि.२६/०५/२०२२.
९. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१३/१२/२०२२ रोजीचे सन २०२२ मधील ०५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ५ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयाव्दारे सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांच्या आढाव्यांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी गठीत अ.मु.स (सेवा)/साप्रवि व प्र.स (व्यय) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उपसमिती व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने सुधारीत आकृतीबंध निश्चित करणेबाबतचे निर्देश दिलेले होते.

२. उक्त संदर्भ क्र.६ येथील गृह विभाग, शासन निर्णय,दि. २५/०२/२०२२ व्दारे पोलीस घटकांतील पोलीस नाईक हा संवर्ग रद्द करुन, या संवर्गातील पदे सहायक पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस शिपाई या पदात वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आवश्यक ते बदल करुन सुधारीत पदांची माहिती या पोलीस घटक कार्यालयाच्या आकृतीबंध प्रस्तावामध्ये दर्शविण्यात आली आहे.

३. त्या अनुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारीत आकृतीबंध प्रस्ताव मंजूरीकरिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय क्र.८ येथील दि.२६/०५/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे शासनास सादर करण्यात आला होता.

४. त्या अनुसार उक्त संदर्भ क्र.९ येथील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या सन २०२२ मधील ५ व्या बैठकीचे इतिवृत्तानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील नियमित व बाह्ययंत्रणेव्दारे घ्यावयाचे मनुष्यबळ सेवा अशा सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आली.

**शासन निर्णय :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय क्र.८ येथील पत्राव्दारे सादर केलेल्या प्रस्तावानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील पोलीस उप महानिरीक्षक,कोकण परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचे सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव हे नवीन पदनिर्मिती / पदांचे पुनरुज्जिवन व पदांचे आढावे इ. प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समिती समोर प्रस्ताव सादर केला होता.

२. सदरहू उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.१३/१२/२०२२ रोजीचे सन २०२२ मधील ५ व्या बैठकीचे इतिवृत्तानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पोलीस घटक कार्यालयांच्या आस्थापनेवरील घटकनिहाय एकूण नियमित **९,३०४** पदे व बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळाच्या एकूण **११९** सेवा अशा सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे.

३. सुधारीत आकृतीबंधानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील नियमित पदांची, तसेच बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळाची माहिती (पदनाम, वेतन श्रेणी, मंजूर पदे) **परिशिष्ट-अ,ब,क,ड,इ,ई** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सोबत जोडण्यात आली आहे.

४. महाराष्ट्र पोलीस दलामधील पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचे सुधारीत आकृतीबंधास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयाच्या सोबतच्या परिशिष्टामध्ये दर्शविलेल्या मनुष्यबळ संख्येच्या मर्यादित सेवा आवश्यकतेनुसार बाह्य यंत्रणेव्दारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, त्या संबंधित संवर्गात सध्या अधिसंख्य म्हणून पदे कार्यरत असल्यास ती पदे वगळून उर्वरित मनुष्यबळ संख्येच्या प्रमाणात सेवा बाह्य यंत्रणेकडून घेण्यात याव्यात. अधिसंख्य पदे जशी निरसित होतील, त्या प्रमाणे आवश्यकतेनुसार बाह्य यंत्रणेव्दारे सेवा घेण्यात याव्यात.

आ) या शासन निर्णयाच्या सोबतच्या परिशिष्टांमध्ये नमूद जे संवर्ग निरसित ठरविण्यात आले आहेत. अशा संवर्गात जितके कर्मचारी कार्यरत असतील तितकी पदे अधिसंख्य ठरविण्यात येत आहेत. अधिसंख्य ठरविलेल्या

पदावरील व्यक्तीच्या सेवा निवृत्ती/राजीनामा/मृत्यू इत्यादी कारणांमुळे ते रिक्त झाल्या नंतर ते अधिसंख्य पद आपोआप रद्द होईल.

इ) बाह्य यंत्रणेव्दारे सेवा घेतांना, वित्त विभागाच्या संदर्भीय क्र.७ येथील दिनांक २७/०४/२०२२ चा व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

५. हा शासन निर्णय मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीचे सन २०२२ मधील ५ व्या बैठकीचे इतिवृत्तानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१४२/आपुक, दिनांक १७/०४/२०२३ व्दारे दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०६३०१४४२४०४८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

(कैलास गायकवाड)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
सर्व सन्माननीय संसद, विधानसभा, विधान परिषद सदस्य यांचे खाजगी सचिव.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, गृह (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (सेवा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ.
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
अपर पोलीस महासंचालक महाराष्ट्र, प्रशिक्षण व खास पथके, राज्य, मुंबई.
पोलीस उप महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, कोकण
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग.

**"परिशिष्ट - ड"**

**घटकाचे नाव:- पोलीस अधीक्षक, रायगड यांचे कार्यालय.**

अ) एकूण नियमित पदे

| अ.क्र. | सध्याचे पदनाम | दि. ३०.०९.२०२१ पर्यंतची मंजूर पदे | वेतनसंरचना | आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **A) पोलीस अधिकारी व अमंलदार यांची पदे** | | | | |
| १ | पोलीस अधिक्षक | १ | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| २ | अप्पर पोलीस अधिक्षक | १ | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| ३ | पोलीस उपअधिक्षक | ९ | S-२० : ५६१००-१७७५०० | ९ |
| ४ | पोलीस निरीक्षक | २९ | S-१८ : ४९१००-१५५८०० | २९ |
| ५ | राखीव पोलीस निरीक्षक | १ | S-१८ : ४९१००-१५५८०० | १ |
| | **एकूण गट - अ (वर्ग-१)** | **४१** | | **४१** |
| ६ | सहायक पोलीस निरीक्षक | ४३ | S-१५ : ४१८००-१३२३०० | ४३ |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | ११८ | S-१४ : ३८६००-१२२८०० | ११८ +2 = 120 |
| ८ | राखीव पोलीस उप निरीक्षक | २ | S-१४ : ३८६००-१२२८०० | २ |
| | **एकूण गट - ब (वर्ग-२)** | **१६३** | | **१६३** |
| ९ | सहायक पोलीस उप | २३६ | S-१० : २९२००-९२३०० | २३६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | निरीक्षक | | | |
| १० | पोलीस हवालदार | ६७५ | S-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | ६७५ +2 = ६७७ |
| ११ | पोलीस नाईक | ० | S-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.७५०/- | ० |
| १२ | पोलीस शिपाई | १,३२७ | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | १,३२७ +2 = १३२९ |
| १३ | सहायक पोलीस निरीक्षक चालक | ६ | S-१० : २९२००-९२३०० | ६ |
| १४ | पोलीस हवालदार चालक | २० | S-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | २० |
| १५ | पोलीस नाईक चालक | ० | S-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.३००/- | ० |
| १६ | पोलीस शिपाई चालक | ४९ | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | ४९ |
| | **एकूण गट - क (वर्ग-३)** | २,३१३ | | २,३१३ +४ = २३१७ |
| | **B) प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे** | | | |
| १७ | वैद्यकिय अधिकारी | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| | **एकूण गट - अ (वर्ग-१)** | **१** | | **१** |
| १८ | कार्यालय अधिक्षक | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| १९ | स्थापत्य कनिष्ठ अभियंता | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| २० | उच्च श्रेणी लघुलेखक | १ | S-१६ : ४४९००-१४२४०० | १ |
| २१ | सहायक लेखाधिकारी | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| २२ | अंगुली मुंद्रा तंज्ञ | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| | **एकूण गट - ब (वर्ग-२)** | **५** | | **५** |
| २३ | प्रमुख लिपीक | ४ | S-१३ : ३५४००-११२४०० | ४ |
| २४ | वरीष्ठ श्रेणी लिपीक | १५ | S-८ : २५५००-८११०० | १५ |
| २५ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ३८ | S-६ : १९९००-६३२०० | ३८ |
| २६ | परिचारीका | १ | S-१३ : ३५४००-११२४०० | १ |
| २७ | औषधनिर्माता | १ | S-१० : २९२००-९२३०० | १ |
| | **एकूण गट - क (वर्ग-३)** | **५९** | | **५९** |
| २८ | प्रमुख अचारी | २ | S-५ : १८०००-५६९०० | ० |
| २९ | सहायक अचारी | २ | S-३ : १६६००-५२४०० | ० |
| ३० | भोजनसेवक | २ | S-१ : १५०००-४७६०० | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | सफाई कामगार | १७ | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| ३२ | कार्यालयीन शिपाई | ८ | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| ३३ | मोतबदार | १ | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| ३४ | वृणोपचारक | १ | S-५ : १८०००-५६९०० | ० |
| ३५ | कक्षसेवक | १ | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| ३६ | शिंपी | १ | S-३ : १६६००-५२४०० | ० |
| ३७ | मोची | १ | S-३ : १६६००-५२४०० | ० |
| ३८ | भाता परिवाहक | १ | S-१ : १५०००-४७६०० | ० |
| **एकूण गट - ड (वर्ग-४)** | | **३७** | | ० |
| **एकूण गट अ ते ड मधील पदे** | | **२,६१९** | | **२,५८२** |

**ब) बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|
| १ | प्रमुख अचारी | २ |
| २ | सहायक अचारी | २ |
| ३ | भोजनसेवक | २ |
| ४ | सफाई कामगार | १७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | कार्यालयीन शिपाई | ८ |
| ६ | मोतबदार | १ |
| ७ | वृणोपचारक | १ |
| ८ | कक्षसेवक | १ |
| ९ | शिंपी | १ |
| १० | मोची | १ |
| ११ | भाता परिवाहक | १ |
| **बाह्य यंत्रणेचे एकूण मनुष्यबळ** | | **३७** |

*****

रायगड जिल्हयातील दिघी सागरी पोलीस ठाणेच्या हददीत दिघी पोर्ट येथे इमिग्रेशन चेकपोस्ट तसेच, सदर चेकपोस्टकरीता पदे निर्माण करण्यास व त्यानुषंगिक येणाऱ्या आवर्ती आणि अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांकः पीओएस-०४१८/प्र.क्र.१०३/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० डिसेंबर, २०२१.

**वाचा** :-

१) अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/रत्नागिरी/बंदर इमिग्रेशन/११५/२०१७, दि.१०.०९.२०१८.
२) वित्त विभागाच्या उपसमितीच्या दि.१७/१२/२०२० रोजी झालेल्या सन २०२० मधील ७ व्या बैठकीचे इतिवृत्त.
३) उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.१३/७/२०२१ रोजी झालेल्या सन २०२१ मधील ४ थ्या बैठकीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना** :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कार्यालयाने उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील दिनांक १०.०९.२०१८ रोजीचे रायगड जिल्हयातील दिघी सागरी पोलीस ठाणेच्या हद्दीत दिघी पोर्ट येथे इमिग्रेशन चेकपोस्ट निर्माण करण्यास, तसेच सदर चेकपोस्टकरीता ९ पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

त्यानुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील उपसमितीच्या दि.१७/१२/२०२० रोजी झालेल्या सन २०२० मधील ७ व्या बैठकीचे इतिवृत्तानुसार उपसमितीने केलेली शिफारस व संदर्भीय क्र.३ येथील दि.१३/७/२०२१ रोजी उच्च स्तरीय सचिव समितीच्या झालेल्या सन २०२१ मधील ४ थ्या बैठकीत उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेली मान्यता विचारात घेवून, शासनाने याप्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**:-.

रायगड जिल्हयातील दिघी सागरी पोलीस ठाणेच्या हद्दीत दिघी पोर्ट येथे इमिग्रेशन चेकपोस्ट निर्माण करण्यास, तसेच सदर चेकपोस्टकरीता ६ पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त इमिग्रेशन चेक पोस्टकरीता पुढील तक्त्यात नमूद केलेली विविध संवर्गातील एकुण ६ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | वेतनसंरचना | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उप निरीक्षक | S-१४-(रू.३८६०० - रू.१२२८००) | ०२ |
| २ | पोलीस हवालदार | S-९-(रू.२६४०० - रू.८३६००)<br>अधिक विशेष वेतन रू.७५०/- | ०२ |
| ३ | पोलीस शिपाई | S-७-(रू.२१७००-६९१००),<br>अधिक विशेष वेतन रू.७५०/- | ०२ |
| | | एकूण पदे | ०६ |

३. उक्त इमिग्रेशन चेक पोस्टकरीता व निर्माण केलेल्या पदांकरीता येणारा आवर्ती खर्च व अनावर्ती खर्चाची प्रतिपुर्ती केंद्र शासनाकडून होणार असल्याच्या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

४. आवश्यक असल्यास, हद्दनिश्चितीबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालकांनी शासनास तात्काळ सादर करावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६७५/२०२१/व्यय-७ /वित्त विभाग, दिनांक २२/१०/२०२१ अन्वये वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्यां www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११२२०१७३३४२४२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GAIKWAD KAILAS ARJUN

Digitally signed by GAIKWAD KAILAS ARJUN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, pseudonym=98E519306D20397D3548D18109910SF0AC1EFDEC, serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D6B984CFAE93893BE65A2785314SA4C04D865CD, cn=GAIKWAD KAILAS ARJUN
Date: 2021.12.20 17:36:38 +05'30'

(कैलास गायकवाड)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.मंत्री,गृह यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री,(बंदरे) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
६. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.